**प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय**
**वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन, नागपूर- ४४०००१**
email-apccfhrmadmn@gmail.com दुरध्वनी-०७१२-२५५६७७३

---

ईमेलद्वारे

क्रमांक कक्ष-१०(२)/आस्था/एक/ प्र.क्र.१७.(२४-२५)/६०८
नागपूर-४४० ००१ दिनांक २५/०७/२०२४

प्रति,
प्रधान सचिव (वने)
महसून व वनविभाग
मंत्रालय,मुंबई-३२

**विषय-** महाराष्ट्र शासन,सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक अकंपा/१२१/प्र.क्र.१०२/आठ, दिनांक २१/०९/२०१७ मध्ये नमुद असलेल्या मुद्या क्रमांक २१ मधील अट शिथिल करुन अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यासाठी प्रतिक्षासुचीमध्ये वारसदारांचे नावात बदल करण्यासंबंधीचा होत असलेला अनुकंपा धारकांवरील अन्याय दुर करण्याबाबत.

**संदर्भ-** १) या कार्यालयाचे पत्र क्र.कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.४(२३-२४)/१२९ दिनांक ३१/०८/२०२३
२) श्री.राजेंद्र विष्णुपंत गांजरे, प्रदेशाध्यक्ष, बहुजनाय वनविभाग अधिकारी व कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य यांचे कडील निवेदन दिनांक २१/०६/२०२४

विषयांकित प्रकरणी श्री.राजेंद्र विष्णुपंत गांजरे, प्रदेशाध्यक्ष, बहुजनाय वनविभाग अधिकारी व कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य यांचेकडील दिनांक २१/०६/२०२४ रोजीचे निवेदन या कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

२ सदर निवेदनात अनुकंपा प्रतिक्षा यादीतील श्री. प्रतिक विजयराव भगत यांचे आईचे नावाऐवजी त्यांचे नाव नोंदविण्याबाबत व श्री. सचिन ज्ञानेश्वरराव निकोसे यांचे भावाचे नावाऐवजी त्यांचे नाव नोंदविण्याबाबत विनंती केली.

३ प्रकरणी याच आशयाचे श्रीमती अनुसया ज्ञानेश्वर कोहचाडे यांचे प्रकरणात या कार्यालयाचे पत्र दिनांक ३१/०८/२०२३ (संदर्भ १) अन्वये प्रचलित शासन धोरणात कर्मचा-यांच्या मृत्युनंतर त्यांच्या पात्र कुटूंबाचे नाव अनुकंपाधारकाच्या प्रतिक्षासुचीमध्ये घेतल्यानंतर मयत शासकिय कर्मचारी यांचे कुटूंबाने विनंती केल्यास त्याऐवजी अन्य पात्र वारसदाराचे नाव प्रतिक्षासुचीमध्ये समाविष्ट करण्याकरीता शासनास शिफारस केलेली असून त्यानुसार प्रचलित शासन धोरणात.सुधारणा होण्यास शासनास विनंती केलेली होती.

४ तरी या कार्यालयाचे पत्र दिनांक ३१/०८/२०२३ (संदर्भ १) वर पुढील सुचना होणेस विनंती आहे.

**सहपत्र**-वरीलप्रमाणे

(शोमीता बिश्वास)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन-दुय्यम संवर्ग)

प्रतिलिपी – १) श्री.राजेंद्र विष्णुपंत गांजरे, प्रदेशाध्यक्ष, बहुजनाय वनविभाग अधिकारी व कर्मचारी संघटना महाराष्ट्र, राज्य

२) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) अमरावती

115
62

# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर, ४४० ००१

<u>ईमेलद्वारे</u>

क्र. कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.४(२३-२४)/129
नागपूर ४४०००१, दिनांक 31/8/2023

प्रति,
प्रधान सचिव (वने)
महसूल व वनविभाग
मंत्रालय, मुंबई-३२

**विषय :** मुळ अर्ज क्रमांक ९६४/२०२०
श्रीमती अनुसया ज्ञानेश्वर कोहचाडे विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर
(अनुकंपा धोरणात सुधारणा करणेबाबत)

**संदर्भ:** १) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर यांचे पत्र क्र. कक्ष-७(२)/आस्था /प्र.क्र.११९/२२-२३/१९८५, दिनांक ३१/३/२०२३
२) सहाय्यक वनसंरक्षक तथा कक्ष अधिकारी,कक्ष-३१ (विधी) यांचेकडील कार्यालयीन टिप्पणी क्र. कक्ष-३१/विधी/प्र.क्र.१६९/२०-२१/९६९, दिनांक १९/५/२०२३

विषयांकित प्रकरणी मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर व सहायक वनसंरक्षक तथा कक्ष अधिकारी कक्ष-३१ (विधी) संदर्भिय पत्रान्वये अनुकंपा नियुक्तीकरीता प्रतिक्षासुचीतील उमेदवाराऐवजी अन्य पात्र वारसदाराचे नाव समाविष्ट करणेकरीता अनुकंपा योजनेमध्ये तशी सुधारणा होणेबाबत शिफारस केली आहे. सदर प्रकरणाची पाश्वभूमी खालीलप्रमाणे आहे.

२. चंद्रपूर वनवृत्तातील श्रीमती अनुसया ज्ञानेश्वर कोहचाडे यांना वयाची ४५ वर्ष पुर्ण झालेली असल्यामुळे अनुकंपा योजनेतंर्गत शासन सेवेत सामावून घेणेसाठी अपात्र ठरत असल्याने त्यांचे नांव गट-ड पदासाठी असलेल्या अनुकंपा धारकांच्या प्रतिज्ञा यादीमधून वगळण्यात आले. त्याऐवजी त्यांचे मुलाचे नांव अनुकंपा प्रतिक्षा यादीत घेणेसंदर्भात त्यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, नागपूर यांचे कडे मुळ अर्ज क्रमांक ९६४/२०२० दाखल केला होता. त्यात मा. न्यायाधिकरणाने दिनांक १३/१०/२०२२ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे. (छायाप्रत संलग्न).

**(i)** The O.A. is allowed in the following terms.

**(ii)** Applicant no.2 will be at liberty to submit an application appointment on compassionate ground in the respondent department. The concerned authority shall deal with such application. If made, on its own merits, expeditiously and in accordance with law.

**(iii)** No order as to costs.

३.	सदर आदेशाचे अनुषंगाने व शासनाचे अनुकंपाविषयक धोरण व तरतूदींनुसार श्री. कुणाल ज्ञानेश्वर कोहचाडे यांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय ठरते किंवा नाही, याबाबत मार्गदर्शन प्राप्त होणेस मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर यांनी दिनांक ९/१/२०२३ चे पत्रान्वये विनंती केली होती. त्यानुसार या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-३१/१४१८, दि. १/२/२०२३ अन्वये, प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने प्रतिवादी यांना /स्वतच्या गुणवत्तेनुसार निर्णय घेण्याबाबत दिलेले दिशानिर्देश, प्रचलीत शासन धोरण/निर्णय याचा सारासार विचार करून गुणवत्तेनुसार निर्णय घेवून केलेल्या कार्यवाहीबाबत अनुपालन अहवाल सादर करणेबाबत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर यांना कळविण्यात आले. तसेच या अनुषंगाने भविष्यात तरतूद करणे अपेक्षित आहे या निष्कर्षाप्रत आपण पोहचले असाल तर त्याबाबत वेगळयाने ठोस व स्वयंस्पष्ट अभिप्रायासह प्रस्ताव सादर करण्याबाबत मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर यांना कळविण्यात आले.

४.	त्यानुसार मुख्य वनसंरक्षक (प्रा), चंद्रपूर यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक ३१/३/२०२३ (संदर्भ १) अन्वये, शासन निर्णयातील प्रचलित तरतुदीनुसार श्री. कुणाल कोहचाडे यांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय ठरत नाही, असे कळविले आहे. तथापी त्यामुळे अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष पार केलेल्या मयत शासकिय कर्मचा-यांच्या कुटूंबाला अनुकंपा नियुक्तीपासुन वंचित राहावे लागत आहे. वास्तविक जेव्हा अनुकंपाधारकांचे नांव ज्येष्ठता यादीमध्ये समाविष्ठ करण्यात येते, तेव्हा जे शासन सेवेत नियुक्तीसाठी पात्र असतात, परंतु ज्येष्ठतेनुसार त्यांच्या क्रमांक येण्यासाठी बराच कालावधी लागत असल्यामुळे त्यांची शासन सेवेत नियुक्तीची वयोमर्यादा ओलांडली जाते. त्यामुळे ते अनुकंपा नियुक्तीसाठी अपात्र ठरतात व मयत शासकिय कर्मचारी यांचे कुटूंबाला आर्थिक स्थैर्य प्राप्त होत नाही. सदरची बाब ही एक प्रकारे मयत शासकिय कर्मचारी यांचे कुटूंबावर अन्यायकारक असून, यामुळे शासनाने ज्या उदात्त हेतूने अनुकंपा योजना सुरू केली तो हेतु साध्य होत नाही, असे अभिप्राय मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर यांनी सादर केले आहेत.

५.	मा.उच्च न्यायालय, व मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरणाने सुध्दा वेळोवेळी अशा प्रकरणामध्ये अर्जदाराचे बाजूने निर्णय दिलेला असून संबंधित अनुकंपाधारक उमेदवार यांचेऐवजी त्यांचे कुटुंबातील इतर पात्र वारसदारांचे नांव अनुकंपा प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ठ करण्याचे निर्देश दिलेले आहेत. सोबत मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी रिट याचिका क्र. ६२६७/२०१८ मध्ये दिनांक ११/३/२०२० रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत व मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, नागपूर यांनी मुळ अर्ज क्रमांक १०४६/२०२२ मध्ये दिनांक २१/२/२०२३ रोजी दिलेल्या निर्णयाची प्रत सादर केलेली आहे. सद्यास्थितीमध्ये नियुक्तीसाठी प्रतिक्षेत असलेल्या अनुकंपाधारकांची संख्या, अनुकंपा तत्वावर भरावयाचे विहित पदांची मर्यादा, अनुकंपाधारक उमेदवारांची वयोमर्यादा ई. बाबी लक्षात घेता, अनुकंपा योजनेमध्ये शासन स्तरावरून खालीलप्रमाणे सुधारणा होणेस मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर यांनी विनंती केलेली आहे.

> **"कर्मचा-यांच्या मृत्युनंतर त्यांच्या पात्र कुटूंबीयाचे नांव अनुकंपाधारकाच्या प्रतिक्षासुचीमध्ये घेतल्यानंतर मयत शासकिय कर्मचारी यांचे कुटूंबाने विनंती केल्यास त्याऐवजी अन्य पात्र वारसदाराचे नांव प्रतिक्षासुचीमध्ये समाविष्ट करण्याची तरतूद करावी."**

६. अनुकंपा नियुक्तीसाठी वयोमर्यादेबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक २१/९/२०१७ मधील परिच्छेद क्र.११(आ) मध्ये पुढील प्रमाणे तरतुद आहे.

*"वयाच्या ४५ वर्षापर्यंतच्याच उमेदवारांना अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय असेल. त्यामुळे प्रतिक्षा सूचीतील उमेदवारांना वयाच्या ४५ वर्षापर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्यांची नावे वयाची ४५ वर्ष पुर्ण होताच आवश्यक ती नोंद घेऊन प्रतिक्षासुचीतून काढून टाकण्यात यावीत."*

तसेच परिच्छेद क्र. २१ नुसार -

*"कर्मचा-याच्या मृत्युनंतर त्याच्या पात्र कुटुंबियांचे नाव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये घेतल्यानंतर त्यांच्याऐवजी अन्य पात्र वारसदाराचे नाव प्रतीक्षासूचीमध्ये घेतले जात नाही. म्हणजेच प्रतीक्षासूचीमधील नाव बदलण्याची तरतुद सध्याच्या धोरणात नाही. परंतु प्रतीक्षासूचीवरील उमेदवाराचेच निधन झाल्यास प्रतीक्षासूचीतील उमेदवाराऐवजी त्याच्या कुटुंबातील अन्य पात्र वारसदाराचे नाव अनुकंपाधारकांच्या प्रतीक्षासूचीमध्ये मूळ उमेदवाराच्या प्रतीक्षासूचीतील दिनांकाला घेतले जाईल".*

७. वरील तरतूदीमध्ये प्रतिक्षा सूचीतील उमेदवारांना वयाच्या ४५ वर्षापर्यंत नियुक्ती न मिळाल्यास त्याचे नाव वगळल्यानंतर त्याचे ऐवजी इतर उमेदवाराचे नाव प्रतिक्षासूचीत समाविष्ट करण्याची तरतूद नाही. तथापी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर यांनी केलेल्या विनंतीनुसार , प्रचलित शासन धोरणात कर्मचा-यांच्या मृत्युनंतर त्यांच्या पात्र कुटूंबीयाचे नांव अनुकंपाधारकाच्या प्रतिक्षासुचीमध्ये घेतल्यानंतर मयत शासकिय कर्मचारी यांचे कुटूंबाने विनंती केल्यास त्याऐवजी अन्य पात्र वारसदाराचे नांव प्रतिक्षासुचीमध्ये समाविष्ट करण्याकरीता शासनास शिफारस करण्यात येत असून त्यानुसार प्रचलित शासन धोरणात सुधारणा होण्यास शासनास विनंती करण्यात येत आहे.

**सहपत्र** :- वरीलप्रमाणे

**मा.प्र.मु.व.सं. (व.ब.प्र.) यांचेकडून अनुमोदीत टिप्पणीनुसार**

(शोमीता बिश्वास)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन-दुय्यम संवर्ग)

**प्रतिलिपी (ई-मेलद्वारे)** :-

१) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), चंद्रपूर
२) कक्ष अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, कक्ष-३१ (विधी)

(111)

बहुजन हिताय, बहुजन सुखाय ॥ हमारी ताकत, हमारी एकता ॥ आपली संघटना, आपली सुरक्षितता ॥

# बहुजनाय वनविभाग अधिकारी व कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य


कार्यालय पत्ता : गुरुकृपा निवास, मेन रोड पुंडलिकबाबा नगर, कठोरा नाका, टॉवर लाईन, अमरावती - 444 604
Email Id : bvaksms@gmail.com

● प्रदेशाध्यक्ष ● राजेन्द्र गांजरे, मो.नं. 77980 55245
● प्रदेश कार्याध्यक्ष ● जगदिश बलोदे, मो.नं. 98238 91672, नितीन काळे
● प्रदेश महासचिव ● राजेश खडसे, मो.नं. 94217 41325
● प्रदेश उप-महासचिव ● विशाल इंगळे, मो.नं. 79724 63762

BVAKSMS

● प्रदेश उपाध्यक्ष ● मनिष जिचोतकार, गणेश सावळे, कु.संध्याताई उमप
● प्रदेश कोषाध्यक्ष ● इकबाल शेख
● प्रदेश सह-कोषाध्यक्ष ● संजय धुर्वे
● प्रदेश कार्यकारीणी सदस्य ● दिपक पाखाळकर, प्रशांत गावंडे, मिलींद वायालीकर, दिनकर आगलावे, निलेश सुरजुसे, सतिश इंगळे
● प्रदेश महिला कार्यकारीणी सदस्य ● कु. चंदना गडलिंग, कु. सुनंदा पुंडकर
● प्रदेश माहिती व प्रसिध्दी अधिकारी ● प्रदिप बावने
● प्रदेश कायदा व विधी सल्लागार प्रमुख ● देवकिशोर गडपांडे, अशोकराव येंडे


प्रस्ताव निवेदन ईमेलद्वारे.

जावक क्रमांक BVAKSMS19224/ 124 / 2024-25
महाराष्ट्र, दिनांक 21 / 06 / 2024

प्रति,
मा.श्री. एकनाथ शिंदे,
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य, मुंबई-032

25 JUN 2024
6415
A82

1024
21/7/24

( सामान्य प्रशासन विभाग संबंधित )

विषय :- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक अकंपा/1217/प्र.क्र.102/आठ, दिनांक 21/09/2017 मध्ये नमुद असलेल्या मुद्या क्रमांक 21 मधील अट शिथिल करुन अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यासाठी प्रतिक्षासुचीमध्ये वारसदारांचे नावात बदल करण्यासंबंधीचा होत असलेला अनुकंपा धारकांवरील अन्याय दुर करण्याबाबत.

अप्रमुवसं (प्रदुसं)
26 JUN 2024

| | | | |
|---|---|---|---|
| संदर्भ -: | 01. | श्री. सचिन ज्ञानेश्वराव निकोसे व श्री. प्रतिक विजयराव भगत दोघेही राहणार अमरावती यांचे दिनांक 03/06/2024 च्या अर्जाची प्रत. | यांनी मा.प्रधान सचिव (वने) मंत्रालय मुंबई यांना विनंती अर्ज देऊन विषयांकीत प्रकरणी अन्याय दुर करण्याबाबतच्या विनंती अर्जाची प्रत संघटनेला दिल्यानुसार. |
| | 02. | मा.प्रशासकिय न्यायाधिकरण खंडपिठ नागपूर यांचेकडील प्रकरण क्रमांक 275/2021 मध्ये दिलेला निर्णय दिनांक 08/08/2022 | |
| | 03. | मा.प्रशासकिय न्यायाधिकरण खंडपिठ नागपूर यांचेकडील प्रकरण क्रमांक 278/2021 मध्ये दिलेला निर्णय दिनांक 16/12/2022 | |
| | 04. | मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील प्रकरण क्रमांक 4061/2021 मध्ये दिलेला निर्णय दिनांक 02/05/2023. | |
| | 05. | मा. उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर यांचेकडील अनुक्रमे 3701/2022, 3964/2022, 667/22, 4918/2022, 5294/2022, 5945/2022, 7300/2022, 7321/2022, 7628/2022, 7484/22, 1565/2022 अशा एकुण 11 प्रकरणांमध्ये दिलेला निर्णय दिनांक 28/05/2024 | |

--**000**--

महोदय,

श्री. प्रतिक विजयराव भगत यांनी प्रतिक्षायादीमध्ये आईचे नावाऐवजी त्यांचे नाव नोंदविण्याबाबत आणि श्री. सचिन ज्ञानेश्वराव निकोसे यांनी प्रतिक्षायादीमध्ये भावाचे नावाऐवजी त्यांचे नाव नोंदविण्याबाबत वनप्रशासनाकडे अनेकवेळा विनंती अर्ज केले. परंतू विषयांकीत प्रकरणी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक अकंपा/1217/प्र.क्र.102/आठ, दिनांक 21/09/2017 मध्ये नमुद असलेल्या मुद्या क्रमांक 21 मध्ये तरतुद नसल्यामुळे नावात बदल करता येणार नाही, असे त्यांना पत्र देऊन कळविले आहे.

त्यामुळे वनप्रशासनाकडुन न्याय मिळत नाही, असे गृहीत धरुन नाईलाजास्तव त्यांनी थेट मा.प्रशासकिय न्यायाधिकरण खंडपिठ नागपूर येथे संदर्भ-02 व 03 प्रकरणे न्यायप्रविष्ठ केले. तदंनतर मा.न्यायालयाने त्यांच्या नावामध्ये बदल करण्यासंबंधी अनुक्रमे दि. 08/08/22 व 16/12/22 अन्वये निर्णय दिला. एवढेच नव्हेतर, मा.उच्च न्यायालय खंडपिठ मुंबई यांनी सुध्दा संदर्भ-04 अन्वये दिनांक 02/05/2023 रोजी नावामध्ये बदल करण्यासंबंधी निर्णय दिला. मा.न्यायालयाच्या निर्णयानंतरही वनप्रशासनाकडे विनंती अर्ज केलेपण त्यांना न्याय मिळाला नाही.

1 (2) (1)

मा.न्यायालयांनी नावात बदल करण्याचा निर्णय दिल्यानंतरही न्याय मिळत नसल्यामुळे अनुकंपा धारकाचे कुटूंबावर ओढावलेल्या विपरित परिस्थितीचा आणि घरची परिस्थिती आर्थिकदृष्टया कमकुवत होत चालल्यामुळे सारासार व साकल्याने विचार करुन विषयांकीत प्रकरणी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक अकंपा/1217/प्र.क्र. 102/आठ, दिनांक 21/09/2017 मध्ये नमुद असलेल्या मुद्या क्रमांक 21 मधील अट शिथिल करुन अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यासाठी प्रतिक्षासुचीमध्ये वारसदारांचे नावात बदल करण्यासंबंधीचा अनुकंपाधारकांवर होत असलेला अन्याय त्वरीत दुर करण्या संबंधी मा.प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई-032 यांना विनंती अर्ज देऊन विनंती केली आहे व त्या अर्जाची एक प्रत संघटनेला दिली आहे.

तसेच अनुकंपाधारकांना वयाच्या 45 वर्षे होईस्तोवर अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यात येते. परंतु प्रतिक्षायादीत वय वाढत असल्याचे चित्र प्रशासनासमोर दिसत असतांनाही अशा अनुकंपाधारकांना नोकरी देण्यात येत नाही, ही सर्वात मोठी प्रशासनाची चुकी आहे. याच धर्तीवर, प्रतिक्षायादीत नोंदविलेल्या अनुकंपाधारकाचे वय वाढत असल्यामुळे त्यांच्या ऐवजी दुस-या वारसदाराच्या नावात बदल करण्याबावतचाही मा.उच्च न्यायालय खंडपिठ नागपूर यांनी संदर्भ-05 अन्वये दिनांक 28/05/2024 रोजी एकुण 11 न्यायप्रविष्ठ प्रकरणी सामुहीक निर्णय दिला.

करिता आपणास विनंती करण्यात येत आहे की, मा.न्यायालयाने दिलेल्या निर्णयाप्रमाणे खालीलप्रमाणे मुद्यांवर संघटनेची मागणी मान्य करावी ही विनंती.

01. महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्रमांक अकंपा/1217/प्र.क्र. 102/आठ, दिनांक 21/09/2017 मध्ये नमुद असलेल्या मुद्या क्रमांक 21 मध्ये, खालीलप्रमाणे सुधारणा करावी की,
   - 01.01 कुटूंबामधील कोणताही एक वारसदार अनुकंपा तत्वावर नोकरी घेण्यास पात्र असेल.
   - 01.02 अनुकंपा तत्वावरील नोकरीचे आदेश मिळेपर्यंत प्रतिक्षायादीत वारसदाराचे नावात फेरबदल करता येईल.
   - 01.03 प्रतिक्षा यादीमधील अनुकंपाधारकांना नोकरी देतांना वय वाढल्यास त्याऐवजी दुस-या वारसदाराचे नाव नोंदविण्यास पात्र असेल.
   - 01.04 अनुकंपाधारकांना अनुकंपा तत्वावर नोकरी अर्ज दाखल केल्यापासून अनुकंपा तत्वावर नोकरीचे आदेश देण्याची मुदत फक्त 5 असेल.

02. पहिलेच तर, कोणताही कर्मचारी मयत झाला तर, त्यांना विहीत वेळेत पेन्शन मिळत नाही. परिणामी कुंटूबांला उपासमारीला सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीमध्ये जर अनुकंपाधारकांना न्यायालयाचे दारे ठोठाविण्यासाठी जावे लागल्यास तर, त्यांना आर्थिक भुर्दंडाला व अनेक समस्येला सामोरे जावे लागते, त्यामुळे ही प्रथा बंद करावी ही विनंती.

(राजेन्द्र विष्णुपंत गांजरे)
प्रदेशाध्यक्ष
बहुजनाय वनविभाग अधिकारी व कर्मचारी संघटना
महाराष्ट्र राज्य रजि.नं.५९०४

प्रतिलिपी -: माहिती व पुढील कार्यवाहीस्तव सविनय सादर -: By Email / Whatsapp.

01. मा. मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई-032
02. मा. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई-032
03. मा. प्रधान सचिव, महसुल व वनविभाग, मंत्रालय मुंबई-032
04. मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
05. मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, प्रशासन दुय्यम संवर्ग, महाराष्ट्र राज्य, नागपूर